**सन २०१९-२० मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत -प्रति थेंब अधिक पीक घटकाच्या अंमलबजावणीसाठी रु.४८३.३३ कोटी निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे....**

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## शासन निर्णय क्रमांकः प्रकृसिं- ०११९/प्र.क्र.४१/१४अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ३० ऑगस्ट, २०१९

**संदर्भ:-**

१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

२) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत - प्रति थेंब अधिक पीक - पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी (Volume-II) च्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

३) कृषि व पदुम विभागाचे पत्र क्र.राकृवि-०३१८/प्र.क्र.८१/१४-अे, दि.६मार्च, २०१९.

४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.PMKSY/AAP-२०१९-२०/Hort-४/२७६/२०१९, दि.२२ मार्च,२०१९.

५) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक १७-३/२०१९-RFS-III, दिनांक २ मे, २०१९.

६) कृषि व पदुम विभागाचे पत्र क्र.PMKSY-०४१९/C.R.१०८/१४-A, दि. ११ जून,२०१९ अन्वये निर्गर्मित राज्य स्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) ८ व्या बैठकीचे इतिवृत्त.

७) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.कोशाशे-४२१८/प्र.क्र.८६/८-अे, दिनांक १९ ऑगस्ट, २०१९.

**प्रस्तावना:**

सन २०१५-१६ पासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत-प्रति थेंब अधिक पीक घटकाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. सदर घटकामध्ये सुक्ष्म सिंचन व इतर घटक अशा दोन उपघटकांचा समावेश आहे. यामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे.

सन २०१७-१८ पर्यंत, प्रति थेंब अधिक पीक घटकाखालील सुक्ष्म सिंचन व इतर घटक असे दोन उप-घटक स्वतंत्रपणे राबविण्यात येत होते व त्याकरीता स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. केंद्र शासनाने सन २०१८-१९ पासून इतर बाबी उप-घटकांतर्गत पाणीसाठे निर्मिती व जलसंवर्धनाची कामे स्वतंत्रपणे न राबविता ती सुक्ष्म

सिंचनाशी संलग्न (Integrated with Micro Irrigation) राबवावीत अशा सूचना दिल्या आहेत आणि इतर उप घटकाचे (Supplementary Water Management Activities) "पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी" असे नामकरण करुन त्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करुन पाणीसाठे व जलसंवर्धनांतर्गत अनुज्ञेय बाबी, त्यावरील अनुज्ञेय खर्च व अनुदान मर्यादा विहीत केली आहे.

कृषी आयुक्तालयाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत - प्रति थेंब अधिक पीक घटकाची सन २०१९-२० मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भाधीन दि. २२ मार्च, २०१९ च्या पत्रान्वये रु.७८६.६६ कोटी (केंद्र हिस्सा रु.४८० कोटी + राज्य हिस्सा रु.३०६.६६ कोटी) रक्कमेचा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास सादर केला होता. तथापि, केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.२ मे २०१९ च्या पत्रान्वये केंद्र हिश्श्याचा रू.२९० कोटी एवढा नियतव्यय कळविलेला आहे. त्यापैकी २० टक्केच्या मर्यादेत निधी "पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी" या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी वापरण्याचे सूचित केले.

उपरोक्त वस्तुस्थिती राज्यस्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) दि.२२ मे,२०१९ च्या बैठकीत निदर्शनास आणून रु.८०० कोटी (केंद्र हिस्सा रु.४८० कोटी + राज्य हिस्सा रु.३२० कोटी) रकमेचा वार्षिक कृती आराखडा समितीच्या मान्येतेसाठी सादर करण्यात आला होता. समितीने सदर आराखडयास मान्यता दिली आहे. राज्यस्तरीय मान्यता समितीने जरी रु.८००कोटी रकमेच्या कार्यक्रमास मान्यता दिली असली तरी केंद्र शासनाने सद्यस्थितीत मंजूर केलेला नियतव्यय व समरुप राज्य हिश्श्याच्या निधीच्या मर्यादेत सन २०१९-२० च्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. त्यानुसार केंद्र हिश्श्याचा रू. २९० कोटी व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा रु.१९३.३३ कोटी अशा एकूण रू. ४८३.३३ कोटी रकमेच्या सन २०१९-२० वर्षाच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, त्यानुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

**१. <u>मंजूर कार्यक्रम:-</u>**

I. राज्यस्तरीय मान्यता समितीने (SLSC) दि.२२ मे, २०१९ च्या बैठकीत प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पिक घटकाच्या सन २०१९-२० या वर्षासाठी रु.८०० कोटी (केंद्र हिस्सा रु.४८० कोटी + राज्य हिस्सा रु.३२० कोटी) रक्कमेच्या वार्षिक कृती आराखडयास मान्यता दिली आहे. तथापि, केंद्र शासनाने मंजूर केलेला केंद्र हिस्सा रु.२९०

कोटी (अक्षरी रुपये दोनशे नव्वद कोटी फक्त) व त्यास समरुप राज्य हिस्सा रु.१९३.३३ कोटी (अक्षरी रुपये एकशे त्र्याण्णव कोटी तेहतीस लाख फक्त) अशा एकूण रु. ४८३.३३ कोटी (अक्षरी रुपये चारशे त्र्याऐंशी कोटी तेहतीस लाख फक्त) निधीच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

II. सदर मंजूर रु. ४८३.३३ कोटी निधीच्या कार्यक्रमाची बाबनिहाय (सूक्ष्म सिंचन व पाणी व्यवस्थापनाच्या पूरक बाबी) अंमलबजावणी केंद्र शासनाकडून बाबनिहाय प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणात करण्यात यावी.

III. सन २०१९-२० वर्षात उपलब्ध होणारा निधी, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात व या योजनेतील लाभार्थ्यांनी पूर्व संमतीने बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचासाठी/बाबींसाठीच वापरण्यात यावा.

२.<u>योजनेची व्याप्ती :-</u>

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत- प्रति थेंब अधिक पिक घटकाची अंमलबजावणी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून राज्यातील उर्वरित संपूर्ण ३४ जिल्ह्यात करण्यात यावी.

३.<u>पात्र लाभार्थी:-</u>

खालील अटींची पूर्तता करणारे शेतकरीच सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील:-

I. शेतकऱ्यांच्या नावे मालकी हक्काचा- ८अ व ७/१२ उतारा असावा.
II. सूक्ष्म सिंचन उप घटकाचा तसेच पाणी व्यवस्थाच्या पुरक बाबी उप- घटकांतर्गत पंपसंच, डिझेल इंजिन, सोलार इंजिन इ. बाबीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी व त्याची नोंद ७/१२ उताऱ्यावर असावी. ७/१२ उताऱ्यावर सिंचनाच्या सुविधेबाबतची नोंद नसल्यास विहीर किंवा शेततळ्याबाबत शेतकऱ्यांकडून स्वयं घोषणापत्र घेण्यात यावे. इतर साधनाव्दारे (बंधारे/कॅनॉल) सिंचनाची व्यवस्था असल्यास संबंधित (जलसंधारण/जलसंपदा) विभागाच्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र शेतकऱ्यांकडून घेण्यात यावे.
III. सामुहिक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास इतर संबंधितांचे करारपत्र असावे.
IV. विद्युत पंपाकरिता कायमस्वरुपी विद्युत जोडणी असावी. त्या पृष्ठ्यर्थ शेतकऱ्यांकडून मागील नजीकच्या काळाची विद्युत बिलाची प्रत प्रस्तावासोबत घ्यावी. सोलर पंपाची व्यवस्था असल्यास सोलर पंप बसवून घेतल्याबाबतचे पत्र व सोलर पंपाबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत घ्यावीत.
V. शेतकऱ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

VI. एखादा लाभधारक योजनेत सहभागी होण्यास पात्र आहे, मात्र त्याच्याकडे आधार क्रमांक नाही, अशा लाभधारकांना आधार क्रमांक प्राप्त होईपर्यंत, आधार नोंदणी पावती/मतदार ओळखपत्र/रेशनकार्ड/पासपोर्ट/पॅनकार्ड/किसान फोटो कार्ड/ मनरेगा कार्ड/ बँक, पोस्ट ऑफिस पासबूक/ शासकीय कर्मचारी असल्यास ओळखपत्र यापैकी पूरावा सादर केल्यास योजनेचा लाभ देण्यात यावा.

VII. अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यात PFMS प्रणालीद्वारे जमा करण्यात यावी.

VIII. पात्र शेतकऱ्यास ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत लाभ दयावा, मात्र सन २०१४-१५ पर्यंत योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याच क्षेत्रावर लाभ घेतल्याच्या तारखेपासून १० वर्षाच्या कालवधीसाठी व सन २०१५-१६ पासून लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याच क्षेत्रावर लाभ घेतल्याच्या तारखेपासून ७ वर्षाच्या कालावधीसाठी अनुदान अनुज्ञेय असणार नाही. तशा प्रकाराचे लेखी निवेदन शेतकऱ्यांकडून घेण्यात यावे. कृषि अधिकारी कार्यालयातील नोंदीवरुन त्याची प्रत्यक्षात खात्री करुन घ्यावी. याबाबतची खातरजमा करण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

४.<u>देय अनुदान:-</u>

I. सूक्ष्म सिंचन :-केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांना देय असलेले अनुदान खालीलप्रमाणे असेल:

| अ.क्र. | शेतकरी वर्गवारी | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १. | अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी | अनुज्ञेय खर्चाच्या ५५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ५५% यापैकी कमी असेल ते. |
| २. | इतर शेतकरी | अनुज्ञेय खर्चाच्या ४५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ४५% यापैंकी कमी असेल ते. |

II. संदर्भाधीन अ.क्र. ५ येथील शासन निर्णयानुसार, मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतंर्गत समाविष्ट क्षेत्रातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन घटकासाठीच्या निधीमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना २५ टक्के व इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देऊन अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के याप्रमाणे अनुदान दयावे

III. पाणी व्यवस्थापन पुरक बाबी - प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक घटकांर्गत, पाणी व्यस्थापनाच्या पुरक बाबी उप-- घटकाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ठरवून दिलेल्या खर्च प्रमाणकानुसार विहीत मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहिल.

**५.योजनेची अंमलबजावणी** :-

I. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत - प्रति थेंब अधिक पीक घटकांतर्गत सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी सन २०१९-२० या वर्षात शेतकऱ्यांकडून ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज स्विकारण्यास या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ६ मार्च २०१९ च्या पत्रान्वये कृषी आयुक्तालयास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार कृषी आयुक्तालयाने अर्ज घेण्यास सुरवात केली आहे. तरीसुध्दा सूक्ष्म सिंचन व पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबीं उप घटकांतर्गत राबवावयाच्या बाबींना प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीकोनातून सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी योजनेस ऑल इंडिया रेडीओ/ दूरदर्शन व लोकराज्य अंक यांच्या माध्यमातून तसेच एस.एम.एस.द्वारे, ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डवर, कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, उप विभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पंचायत समिती, तहसील व जिल्हा परिषद या कार्यालयांमध्ये दर्शनी भागावर माहिती पत्रके लावून योजनेस व्यापक प्रसिध्दी दयावी. माहिती पत्रकामध्ये अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे स्विकारणे, योजनेच्या अटी व शर्ती, अर्जदाराने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे यांचा स्पष्ट उल्लेख करावा.

II. या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेल्या कार्यक्रमाच्या मर्यादेत कृषी आयुक्तालयाने सर्व जिल्ह्यांना लक्षांक ठरवून द्यावेत.

III. शेतकऱ्यांकडून अर्ज फक्त ऑनलाईन प्रणालीव्दारेच स्विकारावेत.

IV. वैयक्तिक लाभार्थ्यांकडून सूक्ष्म सिंचन व पाणी व्यवस्थानाच्या पुरक बाबीं या दोन उप घटकांसाठी स्वतंत्र अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारावेत.

V. अर्ज स्विकारण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी:

i. प्रति थेंब अधिक पीक घटकांतर्गत ऑनलाईन अर्ज करु इच्छिणाऱ्या अर्जदाराने सर्वप्रथम स्वत:ची नोंदणी करुन घ्यावी, नोंदणीमध्ये पुढील बाबी नमूद कराव्यात:-

अ. स्वत:चे नाव व पत्ता (पिन कोडसह) (बँकेच्या पासबुक व आधार कार्डवर दर्शविल्याप्रमाणे)

ब.आधार कार्ड क्रमांक

क.बँक खाते क्रमांक

ड.मतदान ओळखपत्र क्रमांक (असल्यास)

इ. पॅन क्रमांक (असल्यास)

ई. मोबाईल क्रमांक

उ. ई-मेल आय डी (असल्यास)

ii. नोंदणी झाल्यानंतर अर्जदाराच्या मोबाईल/ई-मेल वर गोपनीय क्रमांक (secret code) पाठवून वरील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी.

VI. अर्जदाराने स्वत:ची नोंदणी केल्यानंतर अर्ज करण्याची प्रक्रिया सुटसुटीत असावी. त्यामध्ये मी सुक्ष्म सिंचन संच बसविलेला नाही व पूर्वसंमती मिळाल्याशिवाय बसविणार नाही, अशाप्रकारच्या प्रमाणपत्राचा समावेश करण्यात यावा.

VII. अर्ज पूर्ण भरुन झाल्यानंतर तो बरोबर असल्याची खात्री करणेकरिता view व print ची सुविधा असेल. एकदा लाभार्थ्यांने अर्ज submit केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करण्याची सुविधा असणार नाही.

VIII. लाभार्थी नोंदणी ते लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम वर्ग करण्यापर्यंतच्या कार्यवाहीबाबत महत्वाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर लाभधारकास एस.एम.एस.व्दारे वेळोवेळी कळविण्यात यावे.

IX. लाभार्थी शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रणालीवर युजर आयडी व पासवर्ड द्यावा. दुबार अर्जांची नोंदणी टाळण्यासाठी मोबाईल नंबरच्या माध्यमातून वन टाईम पासवर्ड द्यावा.

X. लाभार्थ्यांने ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर स्वयंचलित संगणकीय प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना चालू वर्षी योजनेंतर्गत मंजूर कृती आराखडयाच्या १००% मर्यादेत (भौतिक व आर्थिक) ऑनलाईन पूर्वसंमती देण्यात यावी.

XI. सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी पुर्वसंमती प्राप्त झाल्यांनतर, लाभार्थी शेतकऱ्याने पूर्वसंमती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अनुक्रमांक ४ येथील नमूद कालावधीत, कृषी आयुक्तालयाकडे नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक अथवा त्यांचे प्राधिकृत विक्रेते/वितरकाकडून त्यांच्या पसंतीच्या कंपनीचा संच खरेदी करावा व प्रत्यक्षात त्यांच्या क्षेत्रावर कार्यान्वित करुन बील ईनव्हाईस व अनुदान मागणीचा प्रस्ताव आवश्यक अभिलेखांच्या प्रतीसह ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करावा.

XII. लाभार्थी शेतकऱ्यांने पूर्वसंमती मिळाल्यानंतर, सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन विहीत कालावधीत बील ईनव्हाईस व अनुदान मागणीचा प्रस्ताव आवश्यक अभिलेखांच्या प्रतिसह ऑनलाईन प्रणालीमध्ये न भरल्यास त्याची पुर्वसंमती संगणकीय प्रणालीद्वारे आपोआप रद्द होईल. तथापि, त्यास पुन्हा नव्याने अर्ज करण्याची संधी उपलब्ध राहिल .

XIII. पुर्वसंमती प्राप्त अर्जदाराने सुक्ष्म सिंचन संच बसवून बील ईनव्हाईस व अनुदान मागणीचा प्रस्ताव आवश्यक अभिलेखांच्या प्रतिसह ऑनलाईन प्रणालीवर सादर केल्यानंतर, तालुका कृषी अधिकारी यांनी प्रस्तावाची, कागदपत्रांची/ अभिलेखांची तपासणी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.५ मधील नमूद कालावधीत करावी व संबंधित पर्यवेक्षक यांना मोका तपासणीसाठी आदेशित करावे.

XIV. संबंधित पर्यवेक्षकानी त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांनी बसविलेल्या १००% प्रकरणाची मोका तपासणी या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट “ अ ”मधील अ ६.

क्रमधील नमूद कालावधीत करुन तपासणी अहवाल संगणकीय प्रणालीवर अपलोड करावा.

XV. मोका तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, तालुका कृषि अधिकारी यांनी, संगणकीय प्रणालीद्वारे अनुदानाची परिगणना करुन, शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे शिफारशीसह या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट अ मधील अनु.क्र.७ येथील नमूद कालावधीत ऑनलाईन प्रणालीवर सादर करावा.

XVI. तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून अनुदानाची परिगणना करुन, अनुदान अदायगीसाठी ऑनलाईन प्रस्ताव प्राप्त झाल्यांनतर, या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट - अ मधील अनु.क्र.८ मधील नमुद कालावधीत अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या राष्ट्रीयकृत बँकेतील आधार संलग्न खात्यात PFMS प्रणालीद्वारे जमा करावी.

XVII. पूर्वसंमती न घेता शेतकऱ्याने सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केली असेल किंवा पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी घटकांतर्गत बाबीची खरेदी करुन/काम करुन अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केला असेल तर अशा शेतकऱ्यास अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

XVIII. जिल्हा पातळीवरील अंमलबजावणी यंत्रणेने लाभार्थ्यांची निवड आणि अनुदानाचे वितरण पारदर्शक पध्दतीने व त्वरेने होईल याची खातरजमा करावी व सर्व ठिकाणी एकसमान पध्दती अवलंबिण्यात यावी.

XIX. या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट- अ अन्वये ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, फलोत्पादन यांची राहिल.

XX. तालुका/जिल्ह्यास ठरवून दिलेल्या आर्थिक/भौतिक उद्दिष्टांएवढे अर्ज लाभार्थ्यांकडून विहित कालावधीत ऑनलाईन भरुन घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी व्यापक प्रयत्न करावेत.

XXI. योजनेची प्रगती पाहून शेतकऱ्यांना अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त (कृषि) यांना प्रदान करण्यात येत आहेत.

### ६. योजना अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना-

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविताना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

I. सुक्ष्म सिंचन संचासाठी अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणत्या कंपन्यांकडून सूक्ष्म सिंचन संच बसवून घ्यावेत त्या कंपन्यांची माहिती सार्वजनिक करण्यात यावी.

II. सदर योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) व पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी (Volume-II) घटकांच्या संदर्भाधीन अनुक्रमे अ.क्र.१ व २ येथील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

III. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेचा भर ठिबक व तुषार सिंचन, पाणी उपयोजना आणि वितरण व्यवस्था, दुय्यम साठवणूक आणि निचरा विकास यासारखे तंत्रज्ञान यथायोग्य विकसित करुन पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची क्षमता वाढविण्यावर असेल.

IV. स्थळ आणि पिक विचारात घेऊन शेतकऱ्यांना किफायतशीर ठरेल अशी सुक्ष्म सिंचन यंत्रणा अवलंबावी (Cost Effective Micro Irrigation System).

V. सुक्ष्म सिंचनासाठी फळबागा व इतर हंगामी कृषी पिकांसाठीही अनुदान देण्यात येते तथापि, योजनेंतर्गत एकूण मंजूर निधीपैकीं किमान २५% निधीचा वापर हंगामी पिकांवर करावा.

VI. उचित तंत्रज्ञान, शेती पध्दती आणि तांत्रिक मदत यांच्या निवडीसाठी ICAR संस्था, राज्यातील कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे इ .संस्थाचा सल्ल घेण्यात यावा .

VII. संबंधित कृषी पर्यवेक्षकांनी त्यांच्या क्षेत्रातील लाभार्थांनी बसविलेल्या १००% सूक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अनु.क्र.६ मधील नमुद कालावधीत पुर्ण करावी. मंडळ कृषी अधिकारी यांनी ३०%, तालुका कृषी अधिकारी यांनी २०%, उप-विभागीय कृषी अधिकारी यांनी ३% तर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी १%, विभागीय कृषी सहसंचालक यांनी प्रतिमाह ५ संच, संचालक फलोत्पादन यांनी प्रतिमहा १ संच याप्रमाणे बसविण्यात आलेल्या संचाची मोका तपासणी करावी.

VIII. योजनेच्या योग्य संनियंत्रणासाठी विभागीय स्तरावर पथक निर्माण करावेत व या पथकामार्फत कमीत कमी ५% आंतर विभागीय मोका तपासणीची पुनुरपडताळणी करण्यात यावी. यासाठी लागणारी वाहने भाडेतत्वावर घेण्यात यावीत व यासाठीचा खर्च केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे प्रशासकीय निधी वापरुन करावा.

IX. मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदी व मानकांनुसार शेतकऱ्यांनी उपकरणे बसविलेली आहेत यांची खातरजमा केल्यानंतरच अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी.

X. संपूर्ण राज्यातील जिल्हानिहाय लाभार्थ्यांची यादी आयुक्तालय स्तरावर एकत्रित करुन राज्य शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. मंजूर अनुदानापैकी कमीत कमी ५०% अनुदान अल्प व अत्यल्प भूधारक प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी वापरण्यात यावे. ३०% लाभार्थी महिला असाव्यात (अल्प व अत्यल्प प्रवर्गातील महिला १५% व इतर प्रवर्गातील १५%). अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीसाठी उपलब्ध करुन दिलेला निधी त्याच प्रवर्गासाठी वापरण्यात यावा.

XI. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रति थेंब अधिक पीक घटकांतर्गत -पाणी व्यवस्थापणाच्या पूरक बाबी उप घटकाची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणीच्या अनुषंगाने अवलंबावयाच्या कार्यपद्धतीच्या अनुषंगाने सविस्तर सुचना निर्गमित करण्यासाठी संचालक, फलोत्पादन यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

XII. पूरक पाणी व्यवस्थापनाच्या पुरक बाबी उप घटकाचा लाभ दिलेल्या वैयक्तिक लाभार्थ्यांस किंवा सामुदायिक/सार्वजनिक क्षेत्रात लाभ दिलेल्या शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन घटकाचा लाभ प्राधान्याने देण्यात यावा.

XIII. लाभार्थ्यांची यादी व त्यांना देण्यात आलेले अनुदान याबाबतची माहिती ग्रामपंचायतीच्या फलकावर दर्शनी भागावर लावण्यात यावी. त्याचप्रमाणे, शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

XIV. योजनेचा सविस्तर त्रैमासिक प्रगती अहवाल पुढील त्रैमासिकाच्या पहिल्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत त्याचप्रमाणे वार्षिक प्रगती अहवाल आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषी,सहकार व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांच्याकडे तसेच राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा.

XV. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेच्या संकेत स्थळावर मंजूर वार्षिक कृति आराखडा प्रसिध्द करण्यात यावा. त्याचप्रमाणे, योजनेची भौतिक आणि आर्थिक प्रगती याबाबतची माहिती केंद्र शासनाच्या MIS प्रणालीमध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अद्ययावत करावी.

XVI. जनजाती उपयोजना (TSP) आणि अनुसूचित जाती उपयोजना (SCSP) या घटकांच्या भौतिक आणि आर्थिक प्रगती बाबतची माहिती विहित प्रपत्रात कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार तसेच राज्य शासनाकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात यावी.

XVII. सुक्ष्म सिंचन संचांना पूर्वसंमती ही जिल्ह्याला मंजूर लक्षांकाच्या मर्यादेत देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत त्या वर्षाच्या अनुदानापेक्षा जास्त रकमेच्या प्रस्तावांना मान्यता देवून अतिरिक्त दायित्व निर्माण करु नये. आर्थिक वर्षात पुर्वसंमती दिलेले प्रस्ताव प्रलंबित राहिल्यास संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

XVIII. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि इतर योजनांमधून सुक्ष्म सिंचन संचासाठी दिलेल्या अनुदानासाठी स्वतंत्र लेखापुस्तक ठेवण्यात यावे.

XIX. संपूर्ण राज्यातील जिल्हा निहाय लाभार्थ्यांची यादी आयुक्तालय स्तरावर एकत्रित करुन राज्य शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

XX. शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन साहित्याच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही अवलंबिण्यात यावी.

XXI. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून त्यानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्ह्यात करण्याकरिता उपरोक्त सर्व सूचना/ अटी समाविष्ठ करुन जिल्हास्तरावर अवलंबावयाच्या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती बाबतच्या सूचना निर्गमित करण्याकरिता संचालक (फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१५५४१७४८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.08.30 16:04:39 +05'30'

**( श्रीकांत आंडगे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मंत्री (कृषी / फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (कृषी) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (जलसंधारण व रोजगार हमी योजना), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) सचिव (ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) आयुक्त (कृषी),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी,वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे
११) संशोधन संचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
१२) संशोधन संचालक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
१३) संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
१४) संशोधन संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
१५) सर्व संचालक, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) विभाग प्रमुख, एकात्मिक जल व्यवस्थापन, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
१७) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी

१८)विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी.

१९)विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, दापोली

२०)विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ, अकोला

२१)सर्व विभागीय कृषी सहसंचालक

२२)जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)

२३)सर्व कृषी विकास अधिकारी/सर्व उपविभागीय कृषी अधिकारी/सर्व तालुका कृषी अधिकारी/

२४)सर्व मंडळ कृषी अधिकारी

२५)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२६)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपुर

२७)संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

२८)संचालक, लेखा व कोषागार, मुंबई

२९)मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी.

३०)उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,कोकण/ नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपुर

३१)उप संचालक, लेखा व कोषागारे कोकण /नाशिक /पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपुर

३२)सर्व कार्यासने व पर्यवेक्षिय अधिकारी (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३३)निवडनस्ती.

## परिशिष्ट – अ

## (शासन निर्णय क्रमांक- प्रकृसिं-०११९/प्र.क्र.४१/१४-अे, दि. ३० ऑगस्ट, २०१९)

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक घटकांतर्गत कार्यवाहीचे टप्पे व कालमर्यादा

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | जबाबदार अधिकारी/ व्यक्ती | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हानिहाय आर्थिक व भौतिक लक्षांक वाटप करणे. | संचालक (फलोत्पादन) | शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून २ दिवसात. |
| २ | वेळोवेळी निधी वितरण करणे. | संचालक (फलोत्पादन) | अनुदान वितरीत झाल्यानंतर २ दिवसात. |
| ३ | तालुका कृषि अधिकाऱ्यांना आर्थिक व भौतिक लक्षांक वाटप करणे. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | संचालक (फलोत्पादन) यांच्याकडुन लक्षांक प्राप्त झाल्यांनतर ७ दिवसात |
| ४ | अर्जदाराने सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करून बील इनव्हाईस व अनुदानाचा प्रस्ताव आवश्यक अभिलेखांच्या प्रतीसह ऑनलाईन प्रणलीद्वारे सादर करणे. | पुर्वसंमती प्राप्त शेतकरी | पूर्वसंमती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत. |
| ५ | शेतकऱ्यांनी ऑनलाईन सादर केलेल्या अनुदानाच्या प्रस्तावाची छाननी करुन संबंधित कृषी पर्यवेक्षकांना मोका तपासणीसाठी आदेशित करणे. | तालुका कृषी अधिकारी | शेतकऱ्यांनी अनुदानासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर केल्यापासून ७ दिवसांच्या कालावधीत |
| ६ | शेतकऱ्यांनी उभारणी केलेल्या सूक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी करणे. | कृषी पर्यवेक्षक | तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर १० दिवसांत |
| ७ | अनुदानाची परिगणना करुन शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे शिफारशीसह ऑनलाईन सादर करणे. | तालुका कृषी अधिकारी | मोका तपासणी झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या ७ दिवसात |
| ८ | अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात PFMS प्रणालीद्वारे जमा करणे. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्याचा प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत. |